संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती



# विद्यावार्ता

१७ सप्टेंबर २०२२

भाग - २

Cover Story

*Sant Gadge Baba*

# AMRAVATI UNIVERSITY

*takes lead in implementing*

# NEP 2020



मा.प्रधानमंत्री

## श्री.नरेंद्र मोदी

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ





ई - पत्रिका

# विद्यावार्ता

२४ सप्टेंबर २०२२

भाग - ३

पृष्ठ संख्या - ३६


## चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीमची ( सी.बी.सी.एस )

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात प्रभावी अंमलबजावणी

### विशेषांक



**मा. श्री. चंद्रकांत पाटील**

उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री,

महाराष्ट्र राज्य

कौशल्याधिष्ठीत, रोजगारक्षम विद्यार्थी तयार होणार


# विद्यापीठ परिक्षेत्रातील पाचही जिल्ह्यांत ७० केंद्रांवर अकरा हजार शिक्षकांना एकाच वेळेला प्रशिक्षण

## महाराष्ट्रात सी.बी.सी.एस. प्रणाली लागू करणारे अमरावती विद्यापीठ पहिले - ना.श्री. चंद्रकांत पाटील





नवीन शैक्षणिक धोरण व सी.बी.सी.एस. ची अंमलबजावणी करणारे व त्यासाठी एकाच दिवशी अकरा हजार शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचा प्रयोग करणारे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ महाराष्ट्रात पहिले असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना.श्री. चंद्रकांतदादा पाटील यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने शैक्षणिक सत्र २०२२-२३ पासून सी.बी.सी.एस. प्रणालीनुसार नवीन अभ्यासक्रम सर्व विद्याशाखेत लागू केला असून त्याबाबत पाचही जिल्ह्यांतील सर्व महाविद्यालयांतील नियमित व सी.एच.बी. शिक्षकांना प्रशिक्षण देण्याकरीता एकदिवसीय 'मास्टर ट्रेनींग' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, त्याप्रसंगी पाचही जिल्ह्यांतील शिक्षकांशी संवाद साधतांना ते बोलत होते. विद्यापीठातील डॉ.के.जी. देशमुख सभागृहात आयोजित कार्यक्रमाला उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव डॉ. विकास चंद्र रस्तोगी, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती श्री भगत सिंह कोश्यारी, अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद, नवी दिल्लीचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे आभासी पद्धतीने, तर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, प्र-कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, एच.आर.डी. केंद्राचे संचालक डॉ. प्रसाद वाडेगांवकर, अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे व्यासपीठावर उपस्थित होते. ना.श्री. चंद्रकांत पाटील मार्गदर्शन करतांना पुढे म्हणाले, विद्यापीठाने उचललेले हे पाऊल ऐतिहासिक असून प्रशिक्षण देण्याचा क्रांतिकारी प्रयत्न आहे. कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी यासाठीचा घेतलेला ध्यास इतर विद्यापीठांसाठी प्रेरणादायी आहे. व्यवसायाभिमुख शिक्षण विद्यार्थ्याला मिळावे, शिक्षणामध्ये रुची निर्माण होवून त्याला आवडीचे विषय शिकता यावे, यासाठी नवीन शैक्षणिक धोरण अमुलाग्र बदल करणारे आहे. विद्यापीठाने सी.बी.सी.एस. पद्धती अभ्यासक्रमात लावण्याचे उचललेले हे पाऊल स्वागतार्ह असून यामुळे सर्वश्रुत विद्यार्थी निश्चितच घडेल आणि त्यातून कौशल्याधिष्ठीत, रोजगारक्षम विद्यार्थी तयार होतील. मातृभाषेतून अभियांत्रिकीचे शिक्षण देण्याचा आमचा प्रयत्न आहे. याशिवाय महाराष्ट्र राज्य फॅकल्टी डेव्हलपमेंट संस्थेच्या माध्यमातून ७५,००० शिक्षकांना प्रशिक्षित केले जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. शासन विद्यापीठाच्या पाठीशी असून विद्यापीठाला सर्वतोपरी मदत दिली जाईल, अशी ग्वाही सुद्धा त्यांनी याप्रसंगी दिली.





विद्यापीठाचे कुलपती मा. राज्यपाल , भगतसिंह कोश्यारी व डॉ. अनिल सहस्त्रबुद्ध व्हिडीओ संदेशाद्वारे मार्गदर्शन करतांना

राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती श्री भगत सिंह कोश्यारी यांनी व्हिडीओ संदेशाद्वारे सांगितले, देशाचे पंतप्रधान ना.श्री. नरेंद्र मोदी साहेबांनी शिक्षणाच्या विकासासाठी महत्वपूर्ण पाऊले उचलली असून भारताचा नवयुवक सर्वज्ञानी, कौशल्यप्राप्त आणि आत्मनिर्भर व्हावा, असे त्यांचे स्वप्न आहे. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी सांगितले, विद्यापीठाने सर्व विद्याशाखेत सी.बी.सी.एस. लागू केले, हा युनिक रेकॉर्ड आहे. राष्ट्रीयस्तरावर कुलगुरू डॉ. मालखेडे यांनी केलेल्या कार्याचा व अनुभवाचा फायदा विद्यापीठाच्या विकासासाठी होत आहे.

***

### कौशल्याधिष्ठीत, रोजगारक्षम विद्यार्थी तयार होणार

# विद्यापीठ परिक्षेत्रातील पाचही जिल्ह्यांत ७० केंद्रांवर अकरा हजार शिक्षकांना एकाच वेळेला प्रशिक्षण

## महाराष्ट्रात सी.बी.सी.एस. प्रणाली लागू करणारे अमरावती विद्यापीठ पहिले - ना.श्री. चंद्रकांत पाटील



मार्गदर्शन करतांना मा. ना. श्री. चंद्रकांतदादा पाटील



नवीन शैक्षणिक धोरण व सी.बी.सी.एस. ची अंमलबजावणी करणारे व त्यासाठी एकाच दिवशी अकरा हजार शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचा प्रयोग करणारे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ महाराष्ट्रात पहिले असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना.श्री. चंद्रकांतदादा पाटील यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने शैक्षणिक सत्र २०२२-२३ पासून सी.बी.सी.एस. प्रणालीनुसार नवीन अभ्यासक्रम सर्व विद्याशाखेत लागू केला असून त्याबाबत पाचही जिल्हांतील सर्व महाविद्यालयांतील नियमित व सी.एच.बी. शिक्षकांना प्रशिक्षण देण्याकरीता एकदिवसीय 'मास्टर ट्रेनींग' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, त्याप्रसंगी पाचही जिल्हांतील शिक्षकांशी संवाद साधतांना ते बोलत होते. विद्यापीठातील डॉ.के.जी. देशमुख सभागृहात आयोजित कार्यक्रमाला उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव डॉ. विकास चंद्र रस्तोगी, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती श्री भगत सिंह कोश्यारी, अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद, नवी दिल्लीचे अध्यक्ष डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे आभासी पद्धतीने, तर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, प्र-कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, एच.आर.डी. केंद्राचे संचालक डॉ. प्रसाद वाडेगांवकर, अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे व्यासपीठावर उपस्थित होते.

ना.श्री. चंद्रकांत पाटील मार्गदर्शन करतांना पुढे म्हणाले, विद्यापीठाने उचललेले हे पाऊल ऐतिहासिक असून प्रशिक्षण देण्याचा क्रांतिकारी प्रयत्न आहे. कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांनी यासाठीचा घेतलेला ध्यास इतर विद्यापीठांसाठी प्रेरणादायी आहे. व्यवसायाभिमुख शिक्षण विद्यार्थ्याला मिळावे, शिक्षणामध्ये रुची निर्माण होवून त्याला आवडीचे विषय शिकता यावे, यासाठी नवीन शैक्षणिक धोरण अमुलाग्र बदल करणारे आहे. विद्यापीठाने सी.बी.सी.एस. पद्धती अभ्यासक्रमात लावण्याचे उचललेले हे पाऊल स्वागतार्ह असून यामुळे सर्वश्रुत विद्यार्थी निश्चितच घडेल आणि त्यातून कौशल्याधिष्ठीत, रोजगारक्षम विद्यार्थी तयार होतील. मातृभाषेतून अभियांत्रिकीचे शिक्षण देण्याचा आमचा प्रयत्न आहे. याशिवाय महाराष्ट्र राज्य फॅकल्टी डेव्हलपमेंट संस्थेच्या माध्यमातून ७५,००० शिक्षकांना प्रशिक्षित केले जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. शासन विद्यापीठाच्या पाठीशी असून विद्यापीठाला सर्वतोपरी मदत दिली जाईल, अशी ग्वाही सुद्धा त्यांनी याप्रसंगी दिली.



## प्रधान सचिव डॉ. विकास चंद्र रस्तोगी म्हणाले

दीड लाख शिक्षकांच्या माध्यमातून महाराष्ट्रात शैक्षणिक बदल घडणार आहे. शिक्षकांना प्रशिक्षित करुन नवीन शैक्षणिक धोरण व अभ्यासक्रमांची माहिती विद्यार्थीकेंद्रीत घटकांपर्यंत पोहोचवावयाची आहे, ते यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करतील. नवतरुणांना गुणवत्तापूर्ण, कौशल्यपूर्ण, रोजगाराभिमुख शिक्षण देण्याची गरज नवीन अभ्यासक्रमामुळे पूर्ण होणार आहे. शिक्षक प्रशिक्षित झाल्यानंतर त्यांनी ओपन इलेक्टीव्ह कोर्सची माहिती विद्यार्थ्यांना द्यावी. ऑनलाईन कोर्स कसे घ्यावे, मल्टीपल एन्ट्री, एक्झिट, ॲकॅडेमिक बँक ऑफ क्रेडीट हे विद्यार्थ्यांसाठी महत्वाचे आहे. शिक्षकांनी नवीन शैक्षणिक धोरण पूर्ण क्षमतेने राबवावे, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.



केंद्रीय पद्धतीने उद्घाटन झाल्यानंतर कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे म्हणाले, पाचही जिल्ह्यांतील सत्तर केंद्रांवर चारशे महाविद्यालयांत अकराशे शिक्षक प्रशिक्षणासाठी जुळले आहेत. नवीन शैक्षणिक धोरणाची यशस्वी अंमलबजावणी हे पंतप्रधानांचे स्वप्न आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्रात अमरावती विद्यापीठ अग्रेसर आहे. शेवटच्या घटकांपर्यंत याचे महत्व पोहोचविण्याचे आमचे ध्येय असून त्यादृष्टीने आम्ही अथक परिश्रम घेत आहे. सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात बदल केला असून यासाठी अभ्यास मंडळ व सर्व प्राधिकारिणींचे मोलाचे सहकार्य मिळाले आहे.

जगातला कुठलाही विषय घेण्याची मुभा या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना मिळाली असून त्यांचे कौशल्य वाढणार आहे. उद्योजकता व रोजगाराच्या संधी सुद्धा विपुल प्रमाणात मिळतील. या अभ्यासक्रमात प्रोजेक्ट, इंटर्नशीप अनिवार्य केली आहे, त्यामुळे परिपूर्ण विद्यार्थी तयार होतील. आत्मनिर्भर भारतासाठी हे पाऊल महत्वाचे असून एन.ई.पी. चे अनेक टप्पे आम्हाला गाठायचे आहे. पुढील पाच वर्षात जी.ई.आर. २७ टक्क्यांवरुन ४० टक्क्यांपर्यंत नेण्याचे आमचे ध्येय आहे. या माध्यमातून देश आत्मनिर्भर होईल, असा आम्हाला विश्वास आहे.



संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन, पुर्ष्पापण व दीपप्रज्वलन तसेच विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्वागतपर भाषण प्र-कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे, प्रास्ताविक व आभार कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, संचालन डॉ. वर्षा कुमार लोमटे व उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील यांनी केले. या कार्यक्रमाला डॉ.के.जी. देशमुख सभागृहात सर्व अधिष्ठाता, तज्ज्ञ प्रशिक्षक, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, सी.एच.बी. शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकमान्य टिळक महाविद्यालयात सीबीसीएस कार्यशाळा संपन्न



वणी दि. १७ : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारा प्राप्त आदेशानुसार लोकमान्य टिळक महाविद्यालयाच्या सभागृहात लोकमान्य टिळक महाविद्यालय वणी, आर्ट्स सायन्स कॉमर्स महाविद्यालय मारेगाव ,नूरजहा बेगम महाविद्यालय वणी, जगन्नाथ महाविद्यालय वणी, लक्ष्मीबाई कला महाविद्यालय शिरपूर तथा नूर जहान महिला विधी महाविद्यालय बुरांडा या सहा महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या उद्बोधनासाठी सी.बी.सी.एस., नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण संचालन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेतील सहा महाविद्यालयातील ६५ प्राध्यापक सहभागी झाले होते.

उद्घाटन सत्रात शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष रमेश बोहरा यांच्या अध्यक्षतेखाली सचिव लक्ष्मण भेदी सहसचिव अशोक सोनटक्के संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या डॉ. अनीता पाटील, प्राचार्य डॉ. प्रसाद खानझोडे खट-उ समिती समन्वयक डॉ. करमसिंग राजपूत हे मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात डॉ. करमसिंग राजपूत यांनी एकाच वेळी संपूर्ण विद्यापीठात ७० जागी ११००० नियमित तथा तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांचे उद्बोधन होत असल्याचे अधोरेखित केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रसाद खानझोडे यांनी विद्यापीठाने योजना करणाऱ्या तज्ञांमध्ये आणि अन्य घटकात सेतू निर्माण करण्यासाठी केलेल्या या आयोजनाबद्दल विशेष आनंद व्यक्त केला.

डॉ. अनीता पाटील यांनी मूळ विषय ,आवड आणि कौशल्य यांच्या समन्वयातून नवीन पिढी अधिक कौशल्य संपन्न आणि कालोचित ज्ञान प्राप्त करेल असा विश्वास व्यक्त करून आपणास यासाठी तयार व्हावे लागेल असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष रमेश बोहरा यांनी या वैशिष्ट्यपूर्ण योजने करिता सर्व संबंधितांना शुभकामना प्रदान केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अभिजित अणे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. प्रफुल कोसे यांनी केले. पुढे कार्यशाळेमध्ये विविध सहा सत्रांमध्ये डॉ अनीता पाटील आणि लोकमान्य टिळक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रसाद खानझोडे यांनी नवीन शैक्षणिक धोरण आणि नवीन अभ्यासक्रमाच्या विविध पैलूंवर सविस्तर विवेचन केले.

# सी.बी.सी.एस. अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये विद्यार्थ्यापर्यंत पोचवावी : डॉ. दया पांडे

## अमोलकचंद महाविद्यालयात प्रशिक्षण कार्यक्रम



यवतमाळ दि १७ : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने २०२२-२३ पासून लागू केलेल्या पसंतीवर आधारीत श्रेयांक पध्दतीचा अभ्यासक्रम समाजातील सर्व स्तरातील विद्यार्थ्यासाठी कौशल्याधिष्ठित व व्यक्तीमत्व विकासाला पुरक आहे. त्यात विविध विकल्पांचा समावेश आहे. हा अभ्यासक्रम त्यातील वैशिष्ठ्यासह प्राध्यापकांनी सर्व विद्यार्थ्यापर्यंत पोचवावा, असे आवाहन तज्ञ प्रशिक्षक प्रा. डॉ. दया पांडे (अमरावती) यांनी शनिवार दि. १७ सप्टेंबर २०२२ रोजी केले.

यवतमाळच्या अमोलकचंद महाविद्यालयांने आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राममनोहर मिश्रा होते. व्यासपिठावर अमोलकचंद विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुप्रभा यादगिरवार, बाभुळगावच्या शिवशक्ती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रतिभा चौधरी, प्रशिक्षण कार्यक्रमाचे संयोजक व अमोलकचंद महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. देविदास चव्हाण होते. दिपप्रज्वलन व संत गाडगे बाबाच्या प्रतिमेचे पुजन झाल्यावर अकीत कैथवास याने स्वागत गीत गायले.

समारोप सत्रामध्ये अध्यक्ष प्राचार्य डॉ. मिश्रा, प्राचार्य डॉ. सुप्रभा व्यादगिरवार प्राचार्य डॉ. अविनाश शिर्के प्राचार्य डॉ.प्रतिभा चौधरी व प्रा. देविदास चव्हाण मंचावर होते. आभार प्रदर्शन प्रा.डॉ. आनंद काकडे यांनी मानले. प्रमाणपत्र वितरणानंतर प्रा. किशोर तायडे यांच्या उदघोषणेत डॉ. राहूल एकबोटे यांच्यासह उपस्थितांनी राष्ट्रगित गायले. या प्रशिषण कार्यक्रमाला ११० प्राध्यापकांची उपस्थिती होती.

# श्रीमती पंचफुला देवी पाटील समाजकार्य महाविद्यालय खडकी येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर कार्यशाळा संपन्न.

**अकोला......**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय खडकी अकोला यांच्या संयुक्त विद्यमान आज दिनांक १७/ ९ २०२२ शनिवारला सकाळी दहा ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत एक दिवशीय पसंती वर आधारित श्रेयांक पद्धतीवर व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर आधारित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमावर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन खडकी येथे पंचफुला देवी पाटील समाजकार्य महाविद्यालयात करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या स्थानिक उद्घाटनीय अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. संकेत काळे हे होते .तर तज्ञ मार्गदर्शक म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे भौतिक शास्त्र विभाग प्रमुख डॉ. संदीप वाघुळे हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून समाजसेवक गजानन हरणे, प्रा. डॉ. मेहरे महाविद्यालयाचे प्राचार्य केशव गोरे , कला महाविद्यालयाचे प्राचार्य येवले मॅडम, प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा. डॉ. रोहित काळे, प्रा डॉ.संदीप भोवते, प्रा. डॉ. कविता कावरे मॅडम, प्रा. डॉ. गणेश बोरकर, प्रा. देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यशाळेमध्ये आभाशी पद्धतीने कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, माननीय प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य विकास चंद्र रस्तोगी, डॉक्टर अनिता शस्त्रबुद्धे, अध्यक्ष अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद नवी दिल्ली, माननीय श्री चंद्रकांत दादा पाटील माननीय मंत्री महोदय उच्चतंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य, महामयीम राज्यपाल तथा कुलपती भगतसिंगजी कोशारी, यांची आभासी पद्धतीने मार्गदर्शन झाले तर दिवसभराच्या चारही सत्र मध्ये तज्ञ मार्गदर्शक डॉ. संदीप वाघुळे यांनी कार्यशाळेला मार्गदर्शन केले.



समारोपीय कार्यक्रमांमध्ये कार्यशाळेला उपस्थित झालेल्या प्राचार्य प्राध्यापकांना प्रमाणपत्राचे वितरण स्थानिक उपस्थित मान्यवर प्राध्यापक डॉ.संकेत काळे, डॉ. संदीप वाघुळे, समाजसेवक गजानन हरणे, प्राचार्य केशव गोरे, प्रा. डॉ. मेहरे ,प्राचार्य येवले मॅडम आदींच्या शुभहस्ते हस्ते वितरण करण्यात आले . कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य केशव गोरे तर संचालन प्रा. डॉ. बळीराम अवचार यांनी केले .कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. या कार्यशाळेला खडकी परिसरातील सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सीबीसीएस प्रणाली द्वारे शिक्षणाची खरी उपयोगीता साधेल : प्रा. डॉ. नितीन सराफ

## विद्यापीठ स्तरीय कार्यशाळेचे प्रभावी आयोजन



स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळ, अमरावती द्वारा संचालित महिला महाविद्यालय व श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ स्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. दिलीप मालखेडे यांच्या मार्गदर्शनामधे विद्यापीठात नव्याने सीबीसीएस प्रणाली लावण्यात आलेली आहे. याबाबत विद्यापीठ परीक्षेत्रातील सर्व शिक्षकांना एकाच वेळी या नव्या प्रणालीबाबत मार्गदर्शन मिळावे या एका अत्यंत महत्वाकांक्षी योजने अंतर्गत या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमधे अंजनगाव सूर्जी येथील सारडा महाविद्यालयाचे प्रा. डॉ. नितीन सराफ यांनी अत्यंत प्रभावी मार्गदर्शन केले. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या प्रेक्षागृहामधे आयोजित या कार्यशाळेमधे आयोजक दोन्ही महाविद्यालयांसोबत श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अध्यापक महाविद्यालय नांदगाव पेठ व गाडगे महाराज महाविद्यालय वलगाव येथील नियमित तसेच घड्याळी तासिकेवरील शिक्षक सहभागी झाले होते. एकूण १५० प्राध्यापकांनी या प्रशिक्षण कार्यशाळेचा लाभ घेतला. कार्यशाळेच्या सुरुवातीला स्थानिक उद्घाटनाच्या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील, प्राचार्य डॉ. उपाध्याय, प्राचार्य डॉ. राऊत, प्राचार्य डॉ. निलीमा अंबाडकर व प्रशिक्षक डॉ. नितीन सराफ हजर होते. आपल्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी मा. कुलगुरु महोदयांची संकल्पना व विद्यापीठाच्या मनुष्यबळ विकास केंद्राच्या माध्यमातून घेतल्या गेलेल्या परीश्रमामुळे हे भव्य आयोजन यशस्वीरीत्या पार पडते आहे असे गौरवोद्गार काढले. संपुर्ण विद्यापीठाच्या एकत्रित उद्घाटन सत्रामधे मा. राज्यपाल महोदय, मा. ना. चंद्रकांतदादा पाटील, मा. रस्तोगी साहेब, मा. कुलगुरु डॉ. दिलीप मालखेडे, मा. प्र-कुलगुरु डॉ. विजयकुमार चौबे व मा. कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी संबोधित केले. या मुख्य उद्घाटन समारंभानंतर प्रशिक्षक डॉ. नितीन सराफ यांनी सीबीसीएस प्रणालीबाबत विस्तृत माहिती दिली. यामधे त्यांनी कोअर विषय कोणते व कसे राहणार, बीलीटी एनहान्समेंट कोर्स कश्या पद्धतीने विकसित केला जाईल यासोबतच कौशल्याधिष्टीत मॉड्यूल्स कसे तयार केले जाणार व त्याचा विद्यार्थ्यांनी कश्या प्रकारे फायदा होणार आहे याबाबत विस्तृत मार्गदर्शन केले. याकरीता त्यांनी अतिशय परीश्रमपूर्वक बनविलेल्या पॉवरपॉईंट प्रेसेंटेशनच्या माध्यमातून विस्तृत माहिती दिली. नव्या प्रणालीमधे ऑनलाईन कोर्सेस ना कश्या प्रकारे क्रेडीट दिले जाणार, ते कोर्सेस विद्यार्थ्यांपर्यंत कसे पोहोचवायचे यासंदर्भात प्रा. सराफ यांनी एकूण तीन सत्रांमधे मार्गदर्शन केले. या सर्व सत्रांनंतर उपस्थित प्राध्यापकांनी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून आपल्या मनातील शंकांचे निरसन करून घेतले. प्रत्येक सत्रानंतर एक पॅनल चर्चा आयोजित करण्यात आली ज्यामधे सहयोगी महाविद्यालयाचे प्राचार्य व काही प्राध्यापक यांच्या माध्यमातून वेगवेगळ्या विषयांच्या बाबतीत चर्चा घडविण्यात आली. यामधे प्राध्यापकांनी उत्साहाने भाग घेतला व सीबीसीएस प्रणाली बाबत सर्व माहिती प्राप्त केली. या संपुर्ण कार्यशाळेचा समारोपीय कार्यक्रम शेवटी संपन्न झाला. यामधे प्राचार्य डॉ. राऊत व प्राचार्य डॉ. अंबाडकर यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाने या निमीत्ताने एक चांगली संधी उपलब्ध करून दिली असे त्यांनी बोलून दाखविले. यावेळी समारोपीय समारंभाच्या अध्यक्ष डॉ. माधुरी चेंडके यांनी या आयोजनाबाबत समाधान व्यक्त केले. वेगवेगळ्या विद्याशाखांचे सर्व प्राध्यापक एकत्रीत येऊन सीबीसीएस बद्दल जाणून घेतात ही खरी नव्या राष्ट्रीय शिक्षा नितीची सुरुवात आहे असे त्यांनी आवर्जून सांगितले. या संपुर्ण कार्यशाळेचे आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी केले. त्यांनी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मालखेडे सर, डॉ. वाडेगावकर, डॉ. लोमटे, त्यांची चमु व उपस्थित सर्वांचे आभार मानले. एका ऐतिहासिक क्षणाचे सहभागी होण्याची ही संधी होती असे त्यांनी नमूद केले. शेवटी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले व राष्ट्रगीताने समारंभाची सांगता झाली.

अमरावती शनिवार १७ सितंबर २०२२ ४

# प्रो. राम मेघे इंस्टीट्यूट ऑफटेक्नोलॉजी एंड रिसर्च बडनेरा में 'सीबीसीएस' कार्यशाला संपन्न

स्थानीय विदर्भ युवा कल्याण समिति अमरावती द्वारा संचालित प्रो. संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय के अंतर्गत राम मेघे इंस्टीट्यूट ऑफ टेक्नोलॉजी एंड रिसर्च बडनेरा में सीबीसीएस कार्यशाला का आयोजन किया गया। यह कार्यशाला शनिवार 17 सितंबर 2022 को संपन्न हुई और प्रो. राम मेघ इंस्टीट्यूट ऑफटेक्नोलॉजी एंड रिसर्च बडनेरा, एच.वी.पी.एम. तथा राजकीय इंजीनियरिंग कॉलेज के 300 से अधिक फैकल्टी सदस्यों ने भाग लिया। यह वर्कशॉप सुबह 10 बजे शुरू हुआ।

जो वास्तविक और आभासी मोड में आयोजित किया गया था। च्वाइस बेस्ट क्रेडिट सिस्टम (सीबीसीएस) छात्रों को कोर, इलेक्टिव, सॉफ्ट स्किल्स में से कोई भी विषय चुनने की स्वतंत्रता देता है ताकि छात्र समग्र और शैक्षणिक विकास में योगदान दे सकें। यूजीसी ने इस गतिविधि का आयोजन इस शिक्षा प्रणाली का निरीक्षण करने के लिए किया है और इसे विश्वविद्यालयों में कैसे एकीकृत किया जा सकता है। विदर्भ यूथ वेलफेयर सोसाइटी के माननीय उपाध्यक्ष एड. डॉ. उदय देशमुख कार्यक्रम के अध्यक्ष और उद्घाटन और कोषाध्यक्ष हैं। हेमंत देशमुख बतौर मुख्य अतिथि मौजूद रहे। इस कार्यशाला के मार्गदर्शक के रूप में प्रो. डॉ वैशाली धनविजय, प्रमुख, गृह विज्ञान विभाग, संत गडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय उपस्थित थे। इस मौके पर सभी कॉलेजों के प्राचार्य और शिक्षक भी मौजूद रहे. इस कार्यक्रम के संयोजक डॉ. ए. डी. शिरभाते एवं समन्वयक डॉ. निक्कू खालसा ने आभार व्यक्त किया। प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राज्यपाल भगत सिंह कोशरी, उच्च एवं तकनीकी शिक्षा मंत्री चंद्रकांत पाटिल, अखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद के अध्यक्ष अनिल सहस्त्रबुद्धे, महाराष्ट्र राज्य के उच्च एवं तकनीकी शिक्षा विभाग के प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय के कुलपति प्रो. डॉ. . दिलीप मलखेड़े, कु. कुलपति प्रो. डॉ. विजय चौबे, कुलसचिव डॉ. वर्चुअल मोड में तुषार देशमुख की रही खास मौजूदगी.. इस वर्कशॉप में प्रो. डॉ। वैशाली धनविजय ने तीन सत्रों में सीबीसीएस के बारे में सभी शिक्षकों को बहुत प्रभावी ढंग से निर्देशित किया और इस कार्यशाला में एक खुला चर्चा सत्र आयोजित किया गया। इसमें विभिन्न कॉलेजों के विशेषज्ञ प्रोफेसरों ने भाग लिया। इस समय प्रो. डॉ. वैशाली धनविजय के प्रो. उन्हें राम मेघे इंस्टीट्यूट ऑफ टेक्नोलॉजी एंड रिसर्च बडनेरा द्वारा सम्मानित किया गया। कार्यशाला का संचालन प्रो. आशा रोकड़े ने किया और डॉ. निक्कू खालसा ने आभार व्यक्त किया। धन्यवाद ज्ञापन में विदर्भ यूथ वेलफेयर सोसाइटी के माननीय अध्यक्ष डॉ. नितिनजी धांडे, उपाध्यक्ष, एड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष डॉ. हेमंत देशमुख, सचिव श्री. युवराज सिंह चौधरी, कार्यकारी सदस्य प्रो. शंकरराव काले, श्री. नितिनजी हिवसे, प्रो. रागिनीताई देशमुख, डॉ. श्रीमती. वैशाली ढांडे, डॉ. श्रीमती पूनमताई चौधरी और संत गडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय, एच. वी.पी.एम. वहीं शासकीय इंजीनियरिंग कॉलेज के सभी प्राचार्य डॉ. जी. आर. बमनोटे, प्रो. राम मेघे इंस्टीट्यूट ऑफ टेक्नोलॉजी एंड रिसर्च बडनेरा, डॉ. अंजलि ढाका, एचवीपीएम इंजीनियरिंग कॉलेज, डॉ. पी.पी. बाडेकर डीन एकेडमिक, गवर्नमेंट इंजीनियरिंग कॉलेज और कार्यक्रम के संयोजक डॉ. ए। डी। शिरभाते और भाग लेने वाले सभी प्राध्यापकों को धन्यवाद दिया गया। राष्ट्रगान के साथ कार्यक्रम का समापन हुआ।



# श्रेयांक पद्धति विषय पर कार्यशाला का आयोजन

**शेगांव :** श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय में पसंद पर आधारित श्रेयांक पद्धति विषय पर आयोजित कार्यशाला सफलतापूर्वक संपन्न हुई.

प्राचार्य ने प्रमुख अतिथियों को सम्मानित कर प्रास्ताविक किया. इस अवसर पर गजानन शिक्षा संस्था सचिव शरद शिंदे, मास्टर ट्रेनर डॉ. केदार ठोसर, डॉ. एस. बी. सोमानी, डॉ. जयकुमार शर्मा, डॉ. गोकुल डामरे, डॉ. राजेन्द्र कोरडे, डॉ. अनंत कुमार कुलकर्णी, डॉ. संतोष बोथे, डॉ. रामेश्वर खड़सन आदि मंच पर विराजमान थे. कार्यशाला में श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय डी. एम. बुरुंगले विज्ञान एवं कला महाविद्यालय, सिद्धिविनायक टेक्निकल कैंपस, माऊली ग्रुप का अभियांत्रिकी महाविद्यालय, दिवंगत उत्तमराव देशमुख बीएड महाविद्यालय, जी. बी. मुरारका कला एवं वाणिज्य महाविद्यालय, सरस्वती महाविद्यालय, कला एवं वाणिज्य महाविद्यालय वरवट बकाल आदि आठ महाविद्यालयों के प्राचार्य, प्राध्यापकों एवं व्यवस्थापन प्रतिनिधियों को मिलाकर कुल 221 प्रतिनिधि सहभागी बने.



डॉ. केदार ठोसर ने सतत चार सत्रों में उपस्थित प्राध्यापकों को पसंद पर आधारित श्रेयांक पद्धति विषय पर मार्गदर्शन किया. सहभागी प्राध्यापकों द्वारा पूछे गए सवालों का संतोषजनक जवाब दिया.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि पसंतीवर आधारीत अभ्यासक्रमावर कार्यशाळा

**पब्लिक पोस्ट नेरपरसोपंत**



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठामार्फत पसंतीवर आधारीत लागू करण्यात आलेल्या अभ्यासक्रमावर आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यासंबंधीच्या तात्विक कार्यान्मक चर्चेसाठी विद्यापीठ निर्देशानुसार नेहरू महाविद्यालय नेरपरसोपंत ( केंद्र क्र. ४०६) येथे ता. १७ सप्टेंबरला एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात नेहरू महाविद्यालय, नेरपरसोपंत (केंद्र क्र. ४०६) येथील १६ पूर्णवेळ प्राध्यापक ६ घड्याळी तासावरील प्राध्यापक आणि राजमाता जिजाऊ महिला महाविद्यालयाचे १० घड्याळी तासावरील प्राध्यापक असे एकूण ३१ प्राध्यापक सहभागी झाले. त्यानंतर नियोजनानुसार स्थानिक उद्घाटन सत्र संपन्न झाले. यात अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. एम.डी. वडते, अतिथी म्हणून डॉ. एम. वाय. जमील, समन्वयक डॉ. एस. व्ही. गावंडे हे उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे संचालन सहसमन्वयक डॉ. व्ही. पी. कुटे यांनी केले.त्यानंतर मुख्य उद्घाटन सत्राचे आभासी प्रक्षेपण सुरू झाले. प्रारंभ विद्यापीठ गीताने करण्यात आला. त्यानंतर प्र-कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले. यावेळी नॅशनल एज्युकेशन पॉलिसी ही संकल्पना आजची असली तरी त्याची बिजे गुरूकुल पध्दतीमध्ये दिसतात असे ते म्हणाले मा.श्री.विकासचंद्र रस्तोगी (प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य) यांनी नव्या शिक्षण पध्दतीमुळे सांस्कृतिक परीवर्तन होणार आहे व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे हे क्रांतीकारी पाऊल आहे. असे मत व्यक्त केले. याद्वारे विद्यार्थी केंद्रीत चांगले कन्टेट निर्माण होईल अशी अपेक्षा करुया.यानंतर अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद, नवी दिल्ली मा. अनिल सहस्त्रबुध्दे यांनी व्हिडीओ द्वारे कार्यशाळेला संदेश दिला. या कार्यशाळेत मोठ्याप्रमाणात शिक्षक सहभागी झालेत.हा अनुभव अत्यंत उत्कृष्ट आहे. यानंतर प्रमुख अथिती म्हणून उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य मा.ना.चंद्रकांतदादा पाटील यांनी संबोधीत केले. यावेळी ते म्हणाले की, एखादे कार्य निष्ठेने केले की, ते पूर्णत्वास जाते. याची प्रचिती आज येत आहे. मा. कुलगुरु डॉ. दिलीप मालखेडे यांनी अतिशय परिश्रम पूर्वक प्रस्तुत कार्य पुढे नेण्याचा संकल्प केलेला आहे. हे नवे आव्हान स्विकारण्या साठी शिक्षकांची फार मोठी जबाबदारी आहे. शासनस्तरावर या प्रकल्पासाठी पूर्णपणे सहकार्य राहील.आभार प्रदर्शन कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी केले. राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती मा. भगतसिंह कोश्यारी यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे सांगितले की प्रस्तुत पाऊल हे शिक्षणाच्या विकासासाठी महत्वपूर्ण असून भारताचा युवक सर्वज्ञानी कौशल्यप्राप्त आणि निर्भर व्हावा असे आहे. आभासी कार्यक्रम संपल्यानंतर सकाळी ११.३० ते दुपारी ४.४० पर्यंत तज्ञ प्रशिक्षक डॉ. एम. वाय. जमील यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या समवेत डॉ. व्ही. ए. खोडस्कर यांनीही काही बाबी समजावून सांगीतल्या. या सर्व सत्रात नॅशनल एज्युकेशन पॉलिसी संबंधाने विस्तृत मार्गदर्शन झाले. यावेळी याक्षेत्रात तज्ञ असलेल्या मार्गदर्शकांच्या पीपीटी दाखविण्यात आल्या. काही व्हिडीओ सुध्दा दाखविण्यात आले.सहभागी प्रतिनिधींना डॉ. प्रवीण बनसोड डॉ. महेश गोमासे यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.सांयकाळी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगत करण्यात आली. कार्यक्रमासाठी समिती सदस्य प्रा. सुरेश इंगळे,डॉ. व्ही.डी.बोके डॉ. काटोले, प्रा. पंकज चव्हाण यांनी परिश्रम घेतले.




# श्रेयांक पध्दती विषयावरील कार्यशाळा उत्साहात

**कारंजा :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापिठाचे कुलगुरु डॉ.दिलीप मालखेडे यांनी पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दती सुरु करण्याचे आदेश दिले. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी क.रा. इन्नाणी महाविद्यालयात १७ सप्टेंबर रोजी आयोजीत एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती संलग्णीत विद्याभारती शैक्षणिक मंडळ अमरावती द्वारा संचलीत स्वा. से. श्री. क. रा. इन्नाणी महाविद्यालयात विद्यापीठाचे सूचनेनुसार शनिवारी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आली होती. या कार्यशाळेत कारंजा येथील स्वा. से. श्री. क. रा. इन्नाणी महाविद्यालय, श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कि. न. गो. कला व वाणिज्य महाविद्यालय, कानिफनाथ विज्ञान महाविद्यालय तसेच शिरपूर येथील स्व. पुंडलिकराव गवळी कला व विज्ञान महाविद्यालय व मालेगाव येथील रामराव झनक कला व वाणिज्य महाविद्यालयातील एकूण ९७ प्राध्यापक सहभागी झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन सत्रात प्रतिमा पूजन व मान्यवराचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्रा. एन. जी. जाधव, शेखरजी बंग, स्थानीय व्यवस्थापन समीती, सदस्य, प्रकाशसेठ गोलेच्छा, प्राचार्य डॉ. ए. एन. देवरे आदि मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. यानंतर मास्टर ट्रेनर डॉ. अंजली बी. बोदडे, डॉ. अर्चना बी. बोदडे यांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले. त्यानंतर झालेल्या प्रश्नोत्तरीत डॉ. के. जी. राजपूत, प्राचार्य डॉ. सुभाष गवई, डॉ. आर. ए. पाटील यांनी चर्चासत्रात सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. ए. ए. नांदगावकर यांनी तर उपस्थितांचे आभार डॉ. टी. डी. राजगुरे यांनी मानले.

# सीबीसीएस प्रणाली द्वारे शिक्षणाची खरी उपयोगीता साधेल : प्रा. डॉ. नितीन सराफ

## विद्यापीठ स्तरीय कार्यशाळेचे प्रभावी आयोजन




स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळ, अमरावती द्वारा संचालित महिला महाविद्यालय व श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठ स्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु मा. डॉ. दिलीप मालखेडे यांच्या मार्गदर्शनामधे विद्यापीठात नव्याने सीबीसीएस प्रणाली लावण्यात आलेली आहे. याबाबत विद्यापीठ परीक्षेत्रातील सर्व शिक्षकांना एकाच वेळी या नव्या प्रणालीबाबत मार्गदर्शन मिळावे या एका अत्यंत महत्वाकांक्षी योजने अंतर्गत या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमधे अंजनगाव सूर्जी येथील सारडा महाविद्यालयाचे प्रा. डॉ. नितीन सराफ यांनी अत्यंत प्रभावी मार्गदर्शन केले. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या प्रेक्षागृहामधे आयोजित या कार्यशाळेमधे आयोजक दोन्ही महाविद्यालयांसोबत श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अध्यापक महाविद्यालय नांदगाव पेठ व गाडगे महाराज महाविद्यालय वलगाव येथील नियमित तसेच घड्याळी तासिकेवरील शिक्षक सहभागी झाले होते. एकूण १५० प्राध्यापकांनी या प्रशिक्षण कार्यशाळेचा लाभ घेतला. कार्यशाळेच्या सुरुवातीला स्थानिक उद्घाटनाच्या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील, प्राचार्य डॉ. उपाध्याय, प्राचार्य डॉ. राऊत, प्राचार्य डॉ. निलीमा अंबाडकर व प्रशिक्षक डॉ. नितीन सराफ हजर होते. आपल्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी मा. कुलगुरु महोदयांची संकल्पना व विद्यापीठाच्या मनुष्यबळ विकास केंद्राच्या माध्यमातून घेतल्या गेलेल्या परीश्रमामुळे हे भव्य आयोजन यशस्वीरीत्या पार पडते आहे असे गौरवोद्गार काढले. संपुर्ण विद्यापीठाच्या एकत्रित उद्घाटन सत्रामधे मा. राज्यपाल महोदय, मा. ना. चंद्रकांतदादा पाटील, मा. रस्तोगी साहेब, मा. कुलगुरु डॉ. दिलीप मालखेडे, मा. प्र-कुलगुरु डॉ. विजयकुमार चौबे व मा. कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी संबोधित केले. या मुख्य उद्घाटन समारंभानंतर प्रशिक्षक डॉ. नितीन सराफ यांनी सीबीसीएस प्रणालीबाबत विस्तृत माहिती दिली. यामधे त्यांनी कोअर विषय कोणते व कसे राहणार, बीलीटी एनहान्समेंट कोर्स कश्या पद्धतीने विकसित केला जाईल यासोबतच कौशल्याधिष्टीत मॉड्यूल्स कसे तयार केले जाणार व त्याचा विद्यार्थ्यांनी कश्या प्रकारे फायदा होणार आहे याबाबत विस्तृत मार्गदर्शन केले. याकरीता त्यांनी अतिशय परीश्रमपूर्वक बनविलेल्या पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून विस्तृत माहिती दिली. नव्या प्रणालीमधे ऑनलाईन कोर्सेस ना कश्या प्रकारे क्रेडीट दिले जाणार, ते कोर्सेस विद्यार्थ्यांपर्यंत कसे पोहोचवायचे यासंदर्भात प्रा. सराफ यांनी एकूण तीन सत्रांमधे मार्गदर्शन केले. या सर्व सत्रांनंतर उपस्थित प्राध्यापकांनी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून आपल्या मनातील शंकांचे निरसन करून घेतले. प्रत्येक सत्रानंतर एक पॅनल चर्चा आयोजित करण्यात आली ज्यामधे सहयोगी महाविद्यालयाचे प्राचार्य व काही प्राध्यापक यांच्या माध्यमातून वेगवेगळ्या विषयांच्या बाबतीत चर्चा घडविण्यात आली. यामधे प्राध्यापकांनी उत्साहाने भाग घेतला व सीबीसीएस प्रणाली बाबत सर्व माहिती प्राप्त केली. या संपुर्ण कार्यशाळेचा समारोपीय कार्यक्रम शेवटी संपन्न झाला. यामधे प्राचार्य डॉ. राऊत व प्राचार्य डॉ. अंबाडकर यांनी मनोगत व्यक्त केले. विद्यापीठाने या निमीत्ताने एक चांगली संधी उपलब्ध करून दिली असे त्यांनी बोलून दाखविले. यावेळी समारोपीय समारंभाच्या अध्यक्ष डॉ. माधुरी चेंडके यांनी या आयोजनाबाबत समाधान व्यक्त केले. वेगवेगळ्या विद्याशाखांचे सर्व प्राध्यापक एकत्रीत येऊन सीबीसीएस बद्दल जाणून घेतात ही खरी नव्या राष्ट्रीय शिक्षा नितीची सुरुवात आहे असे त्यांनी आवर्जून सांगितले. या संपुर्ण कार्यशाळेचे आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी केले. त्यांनी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मालखेडे सर, डॉ. वाडेगावकर, डॉ. लोमटे, त्यांची चमु व उपस्थित सर्वांचे आभार मानले. एका ऐतिहासिक क्षणाचे सहभागी होण्याची ही संधी होती असे त्यांनी नमूद केले. शेवटी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले व राष्ट्रगीताने समारंभाची सांगता झाली.

# नॅकच्या नवीन कार्यप्रणालीवर कार्यशाळा




**अमरावती/ का.प्र.**

श्री. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती शैक्षणिक गुणवत्ता समिती, तक्षशिला महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर डॉ. KGIET, दारापूर रामकृष्ण बी.एड. कॉलेज, अमरावती IQAC-SG अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या संयुक्तपणे NAAC नवीन पद्धती - २०२२ वर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन तीन सत्रात आयोजित करण्यात आले होते.

उद्घाटन सत्रात आयक्यूएसी एसजीबी अमरावती विद्यापीठाचे संचालक डॉ. संदीप ए. वाघुले यांनी मुख्य भाषण केले. यांनी NAACW मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अस्तित्वात आलेल्या संरचनात्मक बदलांबद्दल तपशीलवार विश्लेषण आणि माहितीचे वर्णन केले. उच्च शिक्षण संस्थांनी दर्जेदार बेंचमार्क प्राप्त करण्यासाठी हाताळल्या जाणाऱ्या पद्धतींचे त्यांनी वर्णन केले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि त्याचे महत्त्व यावरही त्यांनी आपले मत मांडले .अध्यक्षांचे भाषण देताना प्रा. पी.आर.एस.राव सरांनी IQAC चे महत्त्व आणि संस्थांची गुणवत्ता वाढविण्यासाठी त्याची कार्ये सांगितली. तसेच तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे उच्च शिक्षणात होत असलेल्या बदलांचे वर्णन केले. उद्घाटन सत्राचे संचालन आयोजक सचिव डॉ. शितल तायडे यांनी केले तर आभार डॉ. प्रणाली पेठे यांनी मानले.

दुसऱ्या सत्रात प्रमुख पाहुणे म्हणून श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावतीचे डॉ. महेंद्र मेटे होते. त्यांनी उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये नॅशनल ॲक्रिडेशन अँड असेसमेंट कौन्सिलने केलेल्या बदलांवर सविस्तर माहिती दिली. त्यांनी नव्याने समाविष्ट केलेल्या पैलूंचे तपशील आणि NAAC बंगलोर द्वारे हटवले जात असलेल्या गुणवत्ता मेट्रिक्सचे वर्णन केले. तयारी करताना महात्त्वाच्या मेट्रिक्सवरही त्यांनी लक्ष केंद्रित केले. अध्यक्षीय भाषणात प्रा.वाय.व्ही.हरणे प्राचार्य रामकृष्ण महाविद्यालय दारापूर यांनी शैक्षणिक संस्थांनी करावयाच्या पद्धतींवर लक्ष केंद्रित केले. तिसऱ्या सत्रात मुख्य वक्ते आयक्यूएसी सदस्य श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावतीचे डॉ. मनीष गायकवाड यांनी विभागवार तपशील तयार करताना विभागाने घ्यावयाची काळजी सांगितली. विभागीय सादरी करणाच्या तपशीलवार निकषनिहाय विश्लेषणाबाबतही त्यांनी चर्चा केली. तक्षशिला महाविद्यालयाचे सहाय प्राचार्य डॉ. अंजन कुमार यांनी नवीन कार्यपद्धतीवर प्रकाश टाकला आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी नवीन मानदंड स्थापित करण्याची इच्छा व्यक्त केली. सत्राचे संचालन डॉ.रोशन अर्डक यांनी केले. तर आभार डॉ.प्रवीण वानखडे यांनी मानले.कार्यशाळेसाठी SDGCT च्या उच्च शिक्षण संस्थांचे सर्व प्राचार्य आणि कर्मचारी उपस्थित होते.

सदर कार्यशाळ यशस्वी करण्याकरिता डॉ.वर्षा गावंडे प्रमुख शैक्षणिक गुणवत्ता समिती श्री. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच या आयोजनाकरिता प्रा.शुद्धोधन कांबळे, डॉ. प्रवीण वानखडे, डॉ. प्रणाली पेटे, प्रा. डी.बी. पवार. डॉ.अनिल नागदेवते, प्रा.पांडे, प्रा. पोलादे,प्रा. अनिल भागत, डॉ.अलोणे, डॉ. कमलाकर पायस , डॉ. अंजली वाठ , प्रा.सचिन पंडित, डॉ. प्रीतेश पाटील , प्रा. मानकर , डॉ.रोषण अर्डक , डॉ शीतल तायडे यांनी परिश्रम घेतले.



***

विविध महाविद्यालयांच्या कर्मचाऱ्यांचा सहभाग

## जेडीआयईटीत 'सीबीसीएस-एनईपी' प्रशिक्षण



लोकमत न्यूज नेटवर्क

**यवतमाळ** : जवाहरलाल दर्डा एज्युकेशन सोसायटी संचालित जवाहरलाल दर्डा अभियांत्रिकी (जेडीआयईटी) महाविद्यालयात पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती (सीबीसीएस) व राष्ट्रीय धोरणावर आधारित (एनईपी) लागू करण्यात आलेल्या अभ्यासक्रमावर प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये यवतमाळ येथील विविध महाविद्यालयांचे १६६ शिक्षक सहभागी झाले होते. मार्गदर्शक म्हणून अमरावती येथील सिपला अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. नीलेश कासट लाभले होते.

### विद्यापीठाद्वारे आभासी पद्धतीने उदघाटन

■ प्रशिक्षणाचे उदघाटन विद्यापीठाद्वारे आभासी पद्धतीने करण्यात आले. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी या माध्यमातून संबोधित केले. आजची शिक्षणप्रणाली व्यवसायाभिमुख आणि आनंददायी असावी, असेही ते म्हणाले. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनीही मार्गदर्शन केले. विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. दिलीप मालखेडे यांचेही अध्यक्षीय संबोधन झाले. आभार कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी मानले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या निर्धारित कार्यक्रमानुसार प्रशिक्षणाला सुरुवात झाली. यावेळी व्यासपीठावर जेडीआयईटीचे प्राचार्य डॉ. रामचंद्र तत्त्ववादी, जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. बारडकर, कॉलेज ऑफ मॅनजमेंट ॲण्ड कॉम्प्युटर सायन्सचे प्राचार्य आर.डी. चांडक आदी उपस्थित होते.

प्रा. डॉ. नीलेश कासट यांनी विद्यापीठातील ४०० महाविद्यालयांचे शिक्षक आज ७० तज्ज्ञ मार्गदर्शकांद्वारे प्रशिक्षण घेत असल्याचे सांगितले. त्यांनी सीबीसीएस प्रणालीच्या विविध घटकांविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी, शिक्षकांनी मांडलेल्या प्रश्नांचे निराकरण केले. प्रशिक्षणात सहभागी शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. रामचंद्र तत्त्ववादी यांनी केले.

## बा.ना.अभियांत्रिकी महाविद्यालयात कार्यशाळा

देशोन्नती वृत्तसंकलन...

**पुसद** ■ येथील बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयात 'पसंतीवर आधारित श्रेयांक पध्दती व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि. १७ सप्टेंबर २०२२ रोजी स. १०.०० करण्यात आले आहे. उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये लवकरच नवीन शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी होऊ घातली आहे. या दृष्टीकोणातून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील सर्वच विद्याशाखा विषयातील अभ्यासक्रमात पसंती वर आधारित श्रेयांक पद्धतीचा अवलंब करण्यास सुरुवात झाली आहे. या पद्धतीतील विविध आयाम व पैलू वर अद्यावत माहिती मिळावी यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, आजी व माजी घड्याळी तासिका प्रमाणे शिकवणारे शिक्षक, महाविद्यालय व्यवस्थापनाचे प्रतिनिधी उद्योजक, पालक व पत्रकार इत्यादी सर्व घटकांकरीता बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. उपरोक्त कार्यशाळे चे आयोजन करण्याची जबाबदारी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालय, पुसद यांचेकडे सोपवली आहे.या कार्यशाळेकरिता डॉ. एच. आर. देशमुख (प्राचार्य आर आर लाहोटी विज्ञान महाविद्यालय, मोर्शी) हे अनुभवी प्रशिक्षक व तज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. **(ता.प्र.)**

# भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथे पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

**प्रतिनिधी । मोर्शी दि.१९ :**

भारतीय विद्या मंदिर, अमरावती द्वारा संचालित भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथे शनिवार, दि. १७/ ०९/ २०२२ रोजी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत "पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेस अध्यक्ष मा. डॉ. रमेश बिजवे, (अध्यक्ष, भारतीय विद्या मंदिर, अमरावती) यांनी शुभेच्छापर संदेशात विद्यापीठाने नव्याने लागू करीत असलेल्या CBCS & NEP धोरण स्वागतार्ह आहे असे मत व्यक्त केले. या कार्यशाळेचे उद्घाटक म्हणून मा. ॲड. यदुराज मेटकर, (सरचिटणीस, भारतीय विद्या मंदिर, अमरावती) यांनी उदघाटकीय मनोगतात "पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धतीमुळे विद्यार्थ्यां चा सर्वांगीण विकास घडेल" असा विश्वास व्यक्त केला. या कार्यशाळेच्या उदघाटन समारंभाच्या अध्यक्षीय मनोगतात या कार्यशाळे संयोजक प्रभारी प्राचार्य मा. डॉ. आर. जी. बांबोळे यांनी 'पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती' विद्यार्थ्यांसाठी कशी उपयुक्त असेल तसेच यामुळे विद्यार्थी कोणत्याही शाखेतील विषयाचे ज्ञान प्राप्त करू शकेल असे मत व्यक्त केले.



'पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती' संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात लागू व्हावी यासाठी मा. कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे, प्र-कुलगुरू मा. विजयकुमार चौबे, कुलसचिव मा. डॉ. तुषार देशमुख, तसेच मानव विद्या शाखेचे संचालक मा. डॉ. आर. ए. वाडेगावकर आदी मान्यवरांनी कार्यशाळेच्या आयोजनातून विद्यापीठाने नव्याने लागू करीत असलेल्या CBCS & NEP बद्दल प्राध्यापकांना प्रशिक्षित करावे व हे आवाहन पेलण्यास सज्ज करावे. यासाठीच "पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण" या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेस विद्यापीठाने नियुक्त केलेले मार्गदर्शक मा. डॉ. देवलाल आठवले यांनी उपस्थित प्राध्यापक वृंदांना PPT च्या सहाय्याने सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेच्या यशस्वीपणे संपन्नतेसाठी विद्यापीठाचे सन्मा. पदाधिकारी व भारतीय विद्या मंदिर, अमरावती संस्थेचे सन्मा. पदाधिकारी तसेच या कार्यशाळेच्या आयोजनाकरीता मा. डॉ. हेमंत देशमुख( प्राचार्य, श्री आर. आर. लाहोटी महाविद्यालय, मोर्शी), मा. प्रा. किशोर तडस (स्व. शिवरामजी हिवसे बी. एड. कोलेज, वरुड), मा. श्री राहुल धवड ( प्राचार्य, श्रीराम कला महाविद्यालय, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोर्शी), मा. प्रा. पूनम महल्ले ( प्राचार्य, पिंगलाक्षी देवी महाविद्यालय, नेरपिंगळाई) आदी मोर्शी तालुक्यातील संयोजक महाविद्यालयांचे सहकार्य लाभले. या उपक्रमास प्राचार्य मा. प्रा. किशोर तडस, प्राचार्य मा. प्रा. पूनम महल्ले, प्राचार्य प्रतिनिधी मा. डॉ. अतिश कोहळे, मा. प्रा. प्रिया मायंदे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच मोर्शी तालुक्यातील सर्व संयोजक महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद उपस्थित होते.

या कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. एल. आर. तेम्भूर्ने यांनी व आभार डॉ. संदीप राऊत यांनी मानले तर समारोपीय समारंभाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान साबळे यांनी व आभार डॉ. सावन देशमुख यांनी मानले.या कार्यशाळेस महाविद्यालयाचे माजी प्राचार्य मा. डॉ. सुरेश बिजवे, प्रा. दीपक काळे, प्रा. विनायक खांडेकर, डॉ. शिरीष टोपरे, प्रा. अरविंद पाझारे, प्रा. गोपाल भलावी, श्री रोहीतप्रसाद तिवारी तसेच तासिका तत्त्वावरील प्राध्यापक वृंद, शिक्षेकत्तर कर्मचारी व रासेयो स्वयंमसेवक उपस्थित होते.

# जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यायात पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धतीवर एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

दर्यापूर दि. १९ । गौरव टोळे

नवीन शैक्षणिक धोरणाला अनुसरून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने सुरु केलेल्या पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती(CBCS) प्रक्रीया व त्यावर आधारित अभ्यासक्रमाची संपूर्ण माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक यांना व्हावी या उद्देशाने श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालयात श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धनजी देशमुख व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ दिलीप मालखेडे यांचे मार्गदर्शनात दि.१७ सप्टेंबरला एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर, श्रीमती कोकीळाबाई गावंडे महिला महाविद्यालय, दर्यापूर, कला व वाणिज्य महाविद्यालय, येवदा, रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर व




डॉ.सौ.कमलताई गवई इंजिनिअरिंग महाविद्यालय, दारापूर या महाविद्यायाचे प्राचार्य व सर्व प्राध्यापक सहभागी झाले होते.

या कार्यशाळेच्या उदघाटन सत्राचे अध्यक्ष अॅड. गजाननराव पुंडकर, उपाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती तर उदघाटक म्हणून प्राचार्य डॉ.अविनाश चौखंडे, श्रीमती कोकीळाबाई गावंडे महिला महाविद्यालय, दर्यापूर, तर प्रमुख उपस्थितीमध्ये प्राचार्य डॉ.अतुल बोडखे, जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर, प्राचार्य डॉ. यशोवर्धन सिंग, कला व वाणिज्य महाविद्यालय, येवदा, प्राचार्य डॉ.यशवंत हरणे, रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर, प्राचार्य डॉ. सत्यपाल वरघट, डॉ.सौ.कमलताई गवई इंजिनिअरिंग महाविद्यालय, दारापूर व प्रशिक्षक प्रा.डॉ.सुमेरसिंग ठाकूर हे सर्व व्यासपीठावर उपस्थित होत.

महाविद्यालयात आयोजित या कार्यशाळेत तज्ञ प्रशिक्षक प्रा.डॉ.सुमेरसिंग ठाकूर यांनी पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती(CBCS) व त्यावर आधारित अभ्यासक्रम याची सविस्तर माहिती तीन सत्रात सर्वांना दिली. या प्रशिक्षणात सहभागी प्राध्यापकांपैकी प्रा.डॉ. डोंगरे, प्रा.डॉ. अतुल टेवरे, प्रा.डॉ.गजानन हेरोळे, प्रा.डॉ.सौ.दांडगे व प्रा.डॉ.नरेंद्र माने यांनी आपले मनोगत व्यक्त करून कार्यशाळा उत्तमपणे आयोजित केल्याचे मनोगत व्यक्त केले.

या कार्यशाळेच्या समारोपीय सत्रात प्राचार्य डॉ.अतुल बोडखे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात या कार्यशाळा आयोजनाची जबाबदारी विद्यापीठाने महाविद्यालयाला दिली त्याबाबत आभार व्यक्त केले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.यशोवर्धन सिंग, कला व वाणिज्य महाविद्यालय, येवदा यांनीसुद्धा या कार्यशाळेच्या यशस्वीतेसंबंधी मनोगतात त्याचे फलित झाल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. या समारोपीय कार्यक्रमाचे संचालन प्रा.डॉ.मिलिंद भिलपवार यांनी तर आभार प्रा.डॉ.प्रकाश पानतावणे यांनी मानले. या कार्यशाळेचा समारोप राष्ट्रगीताने झाला.

# राष्ट्रीय शिक्षा नीति-क्रेडिट आधारित विकल्प प्रणाली कार्यशाला

भास्कर संवाददाता | अकोला

संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय एवं महाविद्यालय के सहयोग से श्रीमती लक्ष्मीबाई राधाकिसन तोष्णीवाल कॉलेज ऑफ कॉमर्स के सभागार में राष्ट्रीय शिक्षा नीति-क्रेडिट आधारित विकल्प प्रणाली पर कार्यशाला का आयोजन किया गया। कार्यक्रम के उद्घाटन सत्र की अध्यक्षता प्राचार्य डॉ.श्रीप्रभु चापके ने की, जबकि दी बेरार जनरल एजुकेशन सोसाइटी के अध्यक्ष एड.मोतीसिंह मोहता, मुख्य उद्घाटक के रूप में उपस्थित रहे। विषय विशेषज्ञ के रूप में संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय के समाजशास्त्र विभाग के प्रमुख डॉ.किशोर राऊत की उपस्थिति रही। कार्यक्रम की शुरुआत दीप प्रज्वलन व सरस्वती पूजा से की गई। कॉलेज के आईक्यूएसी के समन्वयक प्रो.डॉ. योगेश अग्रवाल ने कार्यक्रम की शुरुआत की। सोसाइटी के अध्यक्ष ने सीबीसीएस के बारे में अपने विचार प्रस्तुत करते हुए अपने दृष्टिकोण से श्रोताओं से बात की। इसी तरह कार्यक्रम के अध्यक्ष प्राचार्य ने सीबीसीएस द्वारा लाए गए परिवर्तन को नोट किया और अपने अध्यक्षीय विचार व्यक्त किए। कार्यक्रम का संचालन डॉ.मोनिका साबू ने किया। संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय में आयोजित इस कार्यशाला के संयुक्त उद्घाटन समारोह में लगभग



400 महाविद्यालयों के 11000 प्राध्यापक एवं 70 प्रशिक्षकों को श्रव्य-दृश्य प्रणाली के माध्यम से जोड़ा गया। विश्वविद्यालय स्तर पर उद्घाटन समारोह में महामहिम राज्यपाल माननीय भगत सिंह कोश्यारी, अमरावती विश्वविद्यालय के कुलपति डॉ.दिलीप मालखेडे, अनिल सहस्त्रबुद्धे, दिल्ली, प्रमुख सचिव उच्च एवं तकनीकि शिक्षा रस्तोगी, कुलगुरु डॉ.चौबे ने मार्गदर्शन किया। आभार प्रदर्शन के बाद प्रत्येक केंद्र पर एक ऑफलाइन सीबीसीएस प्रशिक्षण कार्यशाला आयोजित की गई। एक दिवसीय कार्यशाला में तीन सत्रों में सीबीसीएस प्रणाली के माध्यम से छात्रों के लिए उपलब्ध पाठ्यक्रम, शिक्षण और मूल्यांकन के बारे में चर्चा की गई। चौथे सत्र में, एक खुला परिचर्चा का आयोजन किया गया, जिसमें उपस्थित प्राध्यापकगणों ने विषय विशेषज्ञों से अपनी शंकाओं को दूर किया। श्रीमती एल.आर.टी कॉमर्स कॉलेज में भी इस तरह से चार सत्र आयोजित किए गए। इन सभी सत्रों में श्री आरएलटी साइंस कॉलेज, अकोला के साथ सुधाकर नाइक आर्ट्स और उमा शंकरखेतान कॉलेज ऑफ कॉमर्स, अकोला, जोशी आर्यभट कॉलेज, मलकापुर, आर्ट्स कॉलेज और अकोला कॉलेज ऑफ जर्नलिज्म नाम के सभी कॉलेजों से लगभग 129 प्रोफेसरों ने भाग लिया। समापन समारोह कार्यक्रम के अंतिम सत्र में आयोजित किया गया। सुधाकर नाइक आर्ट्स कॉलेज के प्राचार्य डॉ.बोबडे ने इस अवसर पर उपस्थित लोगों से बातचीत की। प्रा. डॉ.नीलेश चोटिया ने आभार प्रदर्शन किया। भाग लेने वाले सभी प्राध्यापकों को प्रमाण पत्र वितरित किए गए। एक दिवसीय सीबीसीएस कार्यशाला का समापन राष्ट्रगान के सामूहिक गायन के साथ किया गया।

# पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये 'पसंतीवर आधारित श्रेयांक पद्धती'कार्यशाळा संपन्न

मलकापूरः-

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील सर्व शाखेमधील विषयातील अभ्यासक्रमात पसंती वर आधारित श्रेयांक पद्धतीचा अवलंब करण्यास सुरुवात झालेली असून या पद्धतीतील विविध आयामानवर अद्यावत माहिती मिळावी या दृष्टिकोनातून महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वर्ग, आजी व माजी तासिका तत्त्वावर शिकवणारे शिक्षक, महाविद्यालय व्यवस्थापनाचे प्रतिनिधी इत्यादी सर्व घटकांकरिता दिनांक १७ सप्टेंबर २०२२ रोजी पद्मश्री डॉ. व्ही बी कोलते इंजिनिअरिंग महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळे करिता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्यावतीने डॉ. प्रफुल्ल अजमीरे यांची प्रशिक्षक मार्गदर्शक म्हणून नियुक्ती केलेली होती. त्यांनी आपल्या सत्रांमधून पसंती वर आधारित श्रेयांक प्रणालीचे पीपीटी द्वारे सविस्तर सादरीकरण केले. बदलत्या काळासोबत आपल्याला कौशल्य आधारित शिक्षणाची गरज कशी आहे. याविषयी या अभ्यासक्रमाची पुनर्रचना असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी सभागृहात उपस्थित असणाऱ्या प्राध्यापकांच्या प्रश्नांची यथोचित उत्तरे देऊन सीबीसीएस पॅटर्न विषयी सुस्पष्टता आणली. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खर्चे तर प्रमुख उपस्थिती म्हणून भातृ मंडळ पुणे येथील अध्यक्ष श्री पुरुषोत्तम पिंगळे, प्रमुख वक्ते म्हणून डॉ. प्रफुल्ल अजमिरे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग यांची उपस्थिती लाभली. प्रमुख अतिथी श्री पुरुषोत्तम पिंगळे यांनी कार्यशाळेस शुभेच्छा दिल्या. प्राचार्य डॉ. अनिल खर्चे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सीबीसीएस अभ्यासक्रम विषयाची उपयुक्तता विशद केली. तसेच शिक्षण क्षेत्रातील या नव्या बदलांना आपण सामोरे जाणे आवश्यक असल्याचे सांगितले. या सत्राचे सूत्रसंचालन प्राध्यापक निलेश राजपूत तर आभार प्रदर्शन प्राध्यापक नितीन खर्चे यांनी केले. अमरावती विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील सर्व महाविद्यालयात एकाच तारखेला एकाच वेळेस प्रशिक्षण देण्यासाठी ७० ठिकाणी कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. मा. कुलगुरु डॉ. दिलीप मालखेडे यांच्या अध्यक्षतेत संपन्न होणारे या कार्यशाळेत अखिल भारतीय तांत्रिक परिषदेचे डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे, महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श्री भगतसिंग कोश्यारी, महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा. चंद्रकांत दादा पाटील, महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव मा. विकासचंद्र रस्तोगी, प्र. कुलगुरु डॉ. व्ही एस चौबे, कुलसचिव डॉक्टर तुषार देशमुख, एचआरडीसी चे संचालक डॉ. वाडेगावकर यांनी दृकश्राव्य स्वरूपात मनोगते व्यक्त केली. कुलगुरु डॉ. दिलीप मालखेडे यांनी कार्यशाळेच्या आयोजनासंबंधीची भूमिका विशद करीत सर्व महाविद्यालयांच्या उत्स्फूर्त सहकार्याबद्दल आनंद व्यक्त केला. कोलते इंजिनिअरिंग महाविद्यालयातील या कार्य शाळेत विविध क्षेत्रांवर प्रेझेंटेशन करीत सीबीसीएस पॅटर्नची सविस्तर माहिती दिली. या अभ्यासक्रमातील विविध संकल्पना अतिशय साध्या सोप्या भाषेत अलगदून दाखविल्या. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी आयोजन समितीचे आयोजक महाविद्यालयाचे प्रशासकीय डीन डॉ. युगेश खर्चे, प्राध्यापक रमाकांत चौधरी, संतोष शेकोकार, सुदेश फरपट, गिरीश पाटील, प्राध्यापिका तेजल खर्चे, मंजिरी करांडे तसेच इतर प्राध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# श्री शिवाजी महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरणानुसार पसंती वर आधारित श्रेयांक पद्धती कार्यशाळा संपन्न

## श्रेयांक पद्धती कार्यशाळा विद्यापीठाचे क्रांतिकारी पाऊल

**चिखली । मयूर मोरे**

श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयात, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात नवीन शिक्षण धोरणानुसार अंमलबजावणी सुरू झालेली आहे याचाच एक भाग म्हणून शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना माननीय पंतप्रधानांच्या वाढदिवशी नवीन शैक्षणिक धोरणानुसार पसंतीक्रम श्रेयांक कार्यशाळा संपन्न झाली. एकाच वेळी 70 ठिकाणी 11000 प्राध्यापकांना प्रशिक्षण देण्याचे कार्य संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने करून नवीन शैक्षणिक धोरणाच्या प्रशिक्षणात क्रांतिकारी पाऊल उचलले आहे, अशा शब्दात राज्याचे *उच्चतंत्र शिक्षण मंत्री मा. ना. चंद्रकांत दादा पाटील* यांनी गौरव उदगार काढले. या कार्यशाळेला, महामहीम राज्यपाल श्री भगतसिंह कोशयारी, , राज्याचे उच्च आणि *तंत्र शिक्षण प्रधान सचिव श्री विकासचंद्र रस्तोगी.अखिल भारतीय तंत्रशिक्षण नवी दिल्लीचे प्रमुख डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे*, आभाशी पद्धतीने मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे राज्याचे उपमुख्यमंत्री माननीय देवेंद्रजी फडणवीस यांनी आपला शुभ संदेश दिला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पाहुण्यांचा परिचय प्र कुलगुरू डॉ. विजयकुमार चौबे यांनी करून दिला तर अध्यक्षीय संबोधन प्रा. दिलीप मालखेडे माननीय कुलगुरू यांनी केले डॉ.तुषार देशमुख कुलसचिव यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि श्री शिवाजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कुलगुरू प्रा. डॉ. दिलीप मालखेडे यांच्या पुढाकारात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात सर्वच विद्या शाखा व विषयातील अभ्यासक्रमात पसंतीवर आधारीत श्रेयांक पद्धतीचा अवलंब करण्यास सुरुवात झाली आहे.



या पद्धतीतील विविध आयामांवर, शिक्षक, घड्याळी तासींकाप्रमाणे शिकवणारे शिक्षक, महाविद्यालयाचे व्यवस्थापनाचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत सर्व तपशील व त्यावरील आवश्यक माहिती देण्यासाठी सर्व संलग्नीत व स्वायत्त महाविद्यालयात १७ सप्टेंबर, २०२२ रोजी एकदिवसीय कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती.

या कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात दुसऱ्या सत्रात प्रा. परमानंद तायडे वाशिम, प्रा. डॉ. मोहम्मद अतीक अमरावती यांनी तज्ञ मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले. यावेळी मंचावर प्राचार्य सुभाष गव्हाणे, प्राचार्य ओमराज देशमुख, डॉ. वनिता पोच्छी, प्रा. प्रफुल गवई, प्राचार्य पवार, प्राचार्य संतोष पिंगळे उपस्थित होते व कार्यशाळेत शिप्रमं तात्यासाहेब महाजन महाविद्यालय चिखली, नारायण देशमुख महाविद्यालय, बीएड महाविद्यालयचे प्राध्यापक सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा.डॉ.पल्लवी नल्ले तर प्रा.डॉ.जगदेव जाधव व प्रा.डॉ.विष्णू पडवाल आभार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी साठी डॉ . मुकुंद कोलते डॉ . धनंजय भोयर डॉ . दिलीप गावंडे यांनी परिश्रम घेतले.

# आदर्श महाविद्यालयात सी बी सी एस-एन ए पी या विषयावर प्रशिक्षण वर्गाचे आयोजन



**धामणगाव रेल्वे | प्रतिनिधी**

